नि. फौ. ख. क्र. १८६/२०२५ निशाणी १५८
जुना सं.फौ.ख.क्र. २१५/२०१६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १० यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – तिरंदाज हरिभाऊ मात्रे

वय – ४८ वर्षे, व्यवसाय – होमगार्ड, पोलीस स्टेशन, बाळापुर

पत्ता – लोटणापुर, बाळापुर, ता. बाळापुर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २५.०२.२०१६ रोजी मी पोलीस स्टेशन, बाळापुर येथे होमगार्ड या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी मी आणि शांताराम गोपनारायण असे केस डायरी आणण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यलयात गेलो होतो. गोपनारायण यांनी महिला पो. कॉ. कडुन केस डायरी घेतली, नंतर मी बाहेर थांबलो. गोपनारायण महिला पो. कॉ. सोबत आतील खोलीत केस डायरी आणण्यासाठी गेले. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, त्यावेळी आम्ही तिघेही होतो. गोपनारायण बाहेर येण्यापुर्वी मी बाहेर थांबलो होतो. मला घटनेबद्दल काही समजले नाही.

(साक्षीदार त्याचे मुळ कथनाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन उलटतपास स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी दिली.)

२. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात म.पो.कॉ. चे नाव स्नेहा भराटे असे होते. त्यांच्याकडे शांताराम गोपनारायणने केस डायरी मागितली होती. त्यानंतर स्नेहा भराटे डायरी आणण्यासाठी आतील रुम गेल्या होत्या. त्यावेळी गोपनारायणने मला सांगितले की, तुम्ही येथे थांबा मी डायरी घेवुन येतो. त्यानंतर ते स्नेहा भराटेसोबत आतील रुममध्ये गेले आणि डायरी घेवुन आहे. डायरी घेवुन आल्यानंतर मी आणि शांताराम गोपनारायण पोलीस स्टेशनला रवाना झालो. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्याकडुन आरोपीने फिर्यादीच्या गालाला हात लावल्याचे मला समजले. (सदर प्रश्नावर आरोपीच्या वकीलांनी हरकत नोंदविली. त्याचा युक्तिवाद की, साक्षीदाराला सदर बाब दुसऱ्याकडुन समजली आहे, त्यामुळे सदर प्रश्न विचारता येणार नाही. त्यावर सरकारी वकीलांनी साक्षीदाराच्या बयानात त्यांनी सदर साक्षीदाराला सदर

बाब दुसऱ्याकडुन समजल्याचे त्यांच्या बयानात नमुद असल्याचे सांगितले. साक्षीदाराचे बयान पाहता साक्षीदाराने त्यांना कथित घटनेबद्दल त्रयस्थ व्यक्तीकडुन समजल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे आरोपीकडुन घेण्यात आलेला आक्षेप फेटाळण्यात येतो.) मला आता माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. त्यातील मजकूर पोलीसांनी तसा का लिहिलेला आहे त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयानातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे लिहिला आहे. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

<u>**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. दिलदार खान यांचे मार्फत**</u>

३. मी सन १९८८ पासुन बाळापुर पोलीस स्टेशन येथे होमगार्ड म्हणुन कार्यरत आहे. आरोपी हे ठाणेदार श्री. मिर्झा यांचे लेखणीक होते. श्रीमती एस.बी. राऊत हया बाळापुर पोलीस स्टेशन येथे सहा.पो.नि. म्हणुन कार्यरत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी, श्री. मिर्झा आणि श्रीमती राऊत यांचा आपसी वादविवाद होता आणि त्यांचे एकमेकांशी पटत नव्हते. आम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात साधारण ०१.०० वाजता गेलो. मला आरोपीने बाहेर थांबण्यास सांगितले त्यानंतर २–४ मिनिटांनी मी आतील खोलीत गेलो. आतील खोलीत फिर्यादीने केस डायरीचे गठ्ठे काढुन संबंधीत केस डायरी शोधली. त्यानंतर आरोपीला संबंधीत डायरी दिल्यानंतर आम्ही तेथुन बाहेर आलो. त्यावेळी तेथील वातावरण खेळीमेळीचे होते.

४. श्री. कुरळकर उरळ पोलीस स्टेशनचे ठाणेदार होते, त्यांना मी ओळखतो. फिर्यादीने श्री. कुरळकर यांच्याविरुध्द तक्रार केल्याचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने श्री. कुरळकर यांना सहकार्य होईल असे बयान दिले होते.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.02.17 10:36:59 +0530

बाळापूर.
दि. १६/०२/२०२६

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.